महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. पी-कॉम/ विद्युत शुल्क /** -22413 **दिनांक :१८.०५.२०१५.**

## वाणिज्य परिपत्रक क्र.२४१.

**विषय :-** महाराष्ट्र शुल्क अधिनियम, १९५८ विद्युत शुल्क वसुली व परताव्याबाबत.

**संदर्भ:-** १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.पीएसआय-२०१३/प्र.क्र.५४/उद्योग-८ दि. ०१.०४.२०१३.
२) वाणिज्य परिपत्रक क्र.२०४/प्र.क्र.पी-कॉम/विद्युत शुल्क/२२५५० दि.०८.०८.२०१३
३) अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.ईएलडी-२०१३/प्र.क्र.१२१/ऊर्जा-१ दि. १९.११.२०१३.
४) अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,क्र.ईएलडी-२०१३/प्र.क्र.७९/ऊर्जा-१ दि. ११.०२.२०१५.
५) अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,क्र.ईएलडी-२०१३/प्र.क्र.७९/ऊर्जा-१ दि. २६.०३.२०१५.

महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियम, १९५८ अन्वये विद्युत ऊर्जेच्या वापरावर शुल्क (ED) बसविण्याची तसेच विद्युत शुल्कात माफी/सवलत देण्याची तरतुद आहे. सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अंतर्गत विहित उद्योगांना इतर सोयी-सवलतीसह विद्युत शुल्क माफीची सवलतही जाहीर करण्यात आली होती. जाहीर केलेल्या या सवलतीच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या (ऊर्जा विभाग) दि.१७.११.२००८ च्या पत्रान्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली होती. या कार्यपध्दतीनुसार उद्योग संचालनालयाच्या सक्षम प्राधिकरणाने संबंधित उद्योगाची विद्युत शुल्क माफीची पात्रता प्रमाणित करावयाची होती. त्या प्रमाणपत्रानुसार आवश्यक नोंदी घेऊन संबंधित उद्योगांना (वीज ग्राहकांना) विद्युत शुल्क माफी देण्याबाबत मुख्य अभियंता (विद्युत) यांनी संबंधित वीज वितरण कंपनीला कळवावयाचे होते. त्यानंतर वीज वितरण कंपनीने संबंधित ग्राहकास विद्युत शुल्क माफीची सवलत द्यावयाची होती. त्याशिवाय इतर प्रकरणी शासनाने विहित केलेल्या दराने विद्युत शुल्क आकारणी संबंधित वीज वितरण कंपनीने करावयाची आहे. तथापि विद्युत शुल्क माफी देण्याची कार्यवाही त्या-त्या वेळी न केल्यामुळे, इतर प्रकरणी विहित दराने विद्युत शुल्क आकारणी न केल्यामुळे व वरील कार्यपध्दतीमुळे विद्युत शुल्क परताव्याची प्रकरणे उद्धभवली होती. अशा प्रकरणांचा तातडीने निपटारा व्हावा म्हणून महाराष्ट्र शासनाने ऊर्जा विभागाच्या समक्रमांक दि.०५.०७.२०१३ (पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे) च्या पत्रान्वये विद्युत शुल्क माफी व परताव्याचे प्रकरण हाताळण्याचे अधिकार रिलायन्स, टाटा, बेस्ट व महावितरण या वीज वितरण कंपन्यांना देण्यातआले होते. शासनाच्या निर्देशनाप्रमाणे महावितरणतर्फे वाणिज्य परिपत्रक २०४ दि. ०८.०८.२०१३ प्रमाणे विद्युत शुल्क माफी व परतावासंबंधी संगणकीय प्रणाली प्रस्तापीत करुण ऑनलाईन पध्दतीने सदर प्रकरणे निकालात काढण्यासंबंधी दिशा निर्देश देण्यात आले होते.

२. वरील दरम्यान सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३ संदर्भाधीन दि.०१.०४.२०१३ च्या आदेशान्वये अस्तित्वात आली आहे. या योजनेच्या अनुषंगाने, उद्योग संचालनालयाच्या सक्षम प्राधिकरणाने विद्युत शुल्क माफी प्रमाणित केल्यानंतर विद्युत शुल्क माफी/सवलत लागू असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाच्या दि.०९.११.२०१३ च्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केले आहे. यामध्ये पुर्वीच्या कार्यपध्दतीनुसार मुख्य अभियंता (विद्युत) यांनी प्रमाणपत्राची नोंद घेऊन संबंधित वीज वितरण

कंपन्यांना कळविण्याचा व तद्नंतर या कंपन्यांनी संबंधित ग्राहकाला विद्युत शुल्क माफी देण्याचा उल्लेख नाही. थोडक्यात उद्योग संचालनालयाच्या सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केल्यानुसार संबंधित वीज वितरण कंपन्यांनी विद्युत शुल्क माफी द्यावयाची आहे.

३. विद्युत शुल्क माफी व परताव्याचे अधिकार शासनाच्या समक्रमांक दि.०५.०७.२०१३ च्या पत्राप्रमाणे वीज वितरण कंपन्यांना देण्याबाबत महाराष्ट्र राज्य वीत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) यांनी केली होती. त्यानुसार शासनातर्फे खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

१) संदर्भाधीन दि.१९.११.२०१३ च्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केल्याप्रमाणे, संदर्भाधीन दि.०१.०४.२०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-३ मध्ये नमूद केलेल्या सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केल्यानुसार संबंधित उद्योगांना/वीज ग्राहकांना विद्युत शुल्क माफी महावितरण कंपनीने द्यावयाची आहे. विद्युत शुल्क माफी देण्याची कार्यवाही, कोणताही विलंब न लावता त्या-त्या वेळी करावयाची आहे.

२) विद्युत शुल्क माफी वेळेवर न दिल्यामुळे किंवा काही अपरिहार्य कारणामुळे विद्युत शुल्क माफी देता न आल्यामुळे तसेच विहित दरानुसार विद्युत शुल्क आकारणी न केल्यामुळे उद्धभवलेल्या विद्युत शुल्क परताव्याच्या प्रकरणी विद्युत शुल्क माफी त्या पुढील देयकात समायोजित करण्यात यावी. तथापि तत्पूर्वी परताव्याचे प्रकरण उद्धभवण्याची सबळ कारणे नमूद करुन अशा प्रकारणास प्रकरण परत्वे महावितरण कंपनीने/ग्राहकाने शासनाची मान्यता घ्यावी.

३) विद्युत शुल्क परताव्याच्या प्रकारणी निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

- संबंधित उपसचिव/सह सचिव — अध्यक्ष.
- मुख्य विद्युत निरिक्षक — सदस्य.
- उद्योग संचालनालयाचे प्रतिनिधी — सदस्य.
- संबंधित कक्ष अधिकारी — सदस्य सचिव.

सदर समितीची बैठक दर ३ महिन्यानी होईल. या समितीची निर्णय संबंधित महावितरण कंपनी/ग्राहकाला कळविण्यात येईल. या समितीच्या निर्णय आल्यानंतर तो संबंधित कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात येईल.

४) शासनाच्या वरील निर्णयाप्रमाणे विद्युत शुल्क माफीची कार्यवाही परिपत्रक २०४ प्रमाणे ऑनलाईन प्रणालीद्वारे पुर्वीच्या पध्दतीनुसार सुरु ठेवावी व कोणत्याही प्रकरणात ग्राहकास परतावा देय असल्यास सदर परताव्या प्रकरणाचा लेखापरिक्षीत प्रस्ताव वरील शासनाने गठीत केलेल्या समितीच्या मान्यतेस पाठविण्याकरीता या कर्यालयास सादर करावा.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**

संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :-**

१. सर्व मुख्य अभियंते, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालये, माहिती व उचित कार्यवाहसाठी
२. मुख्य महाव्यवस्थापक (निगम वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई.

**प्रत रवाना :**

१. सर्व अधिक्षक अभियंते, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
२. महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), ३ रा मजला, हॉगकॉंग इमारत, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३. सर्व कार्यकारी अभियंते, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
४. सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये.

---- उचित कार्यवाहीसाठी.

R-21322

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक-ईएलडी २०१३/प्र.क्र.७९/ऊर्जा-१
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक — २६.०३.२०१५.

Dir (OP) / Letter / 829
Date : 13/4/15

मु. अ./वाणिज्य/आवक क्र. 1707
तारीख 10/4/2015

प्रति,

१) व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व),
मुंबई — ४०० ०५१.

२) व्यवस्थापकीय संचालक,
द. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॉम्बे हाऊस,
२४, होमी मोदी स्ट्रिट,
मुंबई — ४०० ००१.

३) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.
इ-४, २ एम.आय.डी.सी.मरोल,
अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.

४) महाव्यवस्थापक,
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,
बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,
मुंबई — ४०० ००५.

CE (Comm) to co-ordinate with CE (IT) for implementation of the directions of GoM

**विषय** — महाराष्ट्र शुल्क अधिनियम, १९५८
विद्युत शुल्क वसुली व परताव्याबाबत.

**संदर्भ** —१) शासन निर्णय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र.पीएसआय-२०१३/ प्र.क्र.५४/उद्योग-८, दि.०१.०४.२०१३.
२)अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.इएलडी-२०१३/प्र.क्र.१२१/ऊर्जा-१, दि.१९ नोव्हेंबर, २०१३.

महोदय,

महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियम, १९५८ अन्वये विद्युत ऊर्जेच्या वापरावर शुल्क (ED) बसविण्याची तसेच विद्युत शुल्कात माफी/सवलत देण्याची तरतूद आहे. सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अंतर्गत विहित उद्योगांना इतर सोयी-सवलतीसह विद्युत शुल्क माफीची सवलतही जाहीर करण्यात आली होती. जाहीर केलेल्या या सवलतीच्या संदर्भात या विभागाच्या दि.१७.११.२००८ च्या पत्रान्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली होती. या

कार्यपध्दतीनुसार उद्योग संचालनालयाच्या सक्षम प्राधिकरणाने संबंधित उद्योगाची विद्युत शुल्क माफीची पात्रता प्रमाणित करावयाची होती. त्या प्रमाणपत्रानुसार आवश्यक नोंदी घेऊन संबंधित उद्योगांना (वीज ग्राहकांना) विद्युत शुल्क माफी देण्याबाबत मुख्य अभियंता (विद्युत) यांनी संबंधित वीज वितरण कंपनीला कळवावयाचे होते. त्यानंतर वीज वितरण कंपनीने संबंधित ग्राहकास विद्युत शुल्क माफीची सवलत द्यावयाची होती. त्याशिवाय इतर प्रकरणी शासनाने विहित केलेल्या दराने विद्युत शुल्क आकारणी संबंधित वीज वितरण कंपनीने करावयाची आहे. तथापि विद्युत शुल्क माफी देण्याची कार्यवाही त्या-त्या वेळी न केल्यामुळे, इतर प्रकरणी विहित दराने विद्युत शुल्क आकारणी न केल्यामुळे व वरील कार्यपध्दतीमुळे विद्युत शुल्क परताव्याची प्रकरणे उद्भवली होती. अशा प्रकरणांचा तातडीने निपटारा व्हावा म्हणून विभागाच्या समक्रमांक दि.०५.०७.२०१३ च्या पत्रान्वये विद्युत शुल्क माफी व परताव्याचे प्रकरण हाताळण्याचे अधिकार रिलायन्स, टाटा, बेस्ट व महावितरण या वीज वितरण कंपन्यांना देण्यात आले होते.

२. वरील दरम्यान "सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३ संदर्भाधीन दि.०१.०४.२०१३ च्या आदेशान्वये अस्तित्वात आली आहे. या योजनेच्या अनुषंगाने, उद्योग संचालनालयाच्या सक्षम प्राधिकरणाने विद्युत शुल्क माफी प्रमाणित केल्यानंतर विद्युत शुल्क माफी/सवलत लागू असल्याचे या विभागाच्या दि.१९.११.२०१३ च्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केले आहे. यामध्ये पुर्वीच्या कार्यपध्दतीनुसार मुख्य अभियंता (विद्युत) यांनी प्रमाणपत्राची नोंद घेऊन संबंधित वीज वितरण कंपन्यांना कळविण्याचा व तद्नंतर या कंपन्यांनी संबंधित ग्राहकाला विद्युत शुल्क माफी देण्याचा उल्लेख नाही. थोडक्यात उद्योग संचालनालयाच्या सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केल्यानुसार संबंधित वीज वितरण कंपन्यांनी विद्युत शुल्क माफी द्यावयाची आहे. त्यामुळे या विभागाच्या समक्रमांक दि.०५.०७.२०१३ च्या पत्रानुसार वीज वितरण कंपन्यांना अधिकार प्रदान करण्याचे औचित्य शिल्लक राहत नाही. तसेच विद्युत शुल्क माफी व परताव्याचे अधिकार वीज वितरण कंपन्यांना देण्यासंदर्भात महालेखापाल कार्यालयाने आक्षेप नोंदविले आहेत. सदर बाबी व संबंधित अधिनियम/नियमावलीतील तरतुदी विचारात घेऊन या विभागाचे दि.०५.०७.२०१३ चे पत्र दि.११.०२.२०१५ च्या पत्रान्वये रद्द करण्यात आले आहे.

३. विद्युत शुल्क माफी व परताव्याचे अधिकार शासनाच्या समक्रमांक दि.०५.०७.२०१३ च्या पत्राप्रमाणे वीज वितरण कंपन्यांना देण्याबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) यांनी केली आहे. या संदर्भात खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) संदर्भाधीन दि.१९.११.२०१३ च्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केल्याप्रमाणे, संदर्भाधीन दि.०१.०४.२०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-३ मध्ये नमूद केलेल्या सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केल्यानुसार संबंधित उद्योगांना/वीज ग्राहकांना विद्युत शुल्क माफी संबंधित वीज वितरण कंपन्यांनी द्यावयाची आहे. संबंधित वीज वितरण कंपन्यांनी विद्युत शुल्क माफी देण्याची कार्यवाही, कोणताही विलंब न लावता त्या-त्या वेळी करावयाची आहे.

२) विद्युत शुल्क माफी वेळेवर न दिल्यामुळे किंवा काही अपरिहार्य कारणामुळे विद्युत शुल्क माफी देता न आल्यामुळे तसेच विहित दरानुसार विद्युत शुल्क आकारणी न केल्यामुळे उद्भवलेल्या विद्युत शुल्क परताव्याच्या प्रकरणी विद्युत शुल्क माफी त्या पुढील देयकात समायोजित करण्यात यावी. तथापि तत्पूर्वी परताव्याचे प्रकरण उद्भवण्याची सबळ कारणे नमूद करुन अशा प्रकरणास प्रकरण परत्वे वीज वितरण कंपनीने/ग्राहकाने शासनाची मान्यता घ्यावी.

३) विद्युत शुल्क परताव्याच्या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

- संबंधित उपसचिव/सह सचिव — अध्यक्ष.
- मुख्य विद्युत निरिक्षक — सदस्य.
- उद्योग संचालनालयाचे प्रतिनिधी — सदस्य.
- संबंधित कक्ष अधिकारी — सदस्य सचिव.

सदर समितीची बैठक दर ३ महिन्यांनी होईल. या समितीचा निर्णय संबंधित वीज वितरण कंपनी/ग्राहकाला कळविण्यात येईल. या समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही संबंधित वीज वितरण कंपनीकडून करण्यात येईल.

४. वरील सुचनांमुळे शासनाचे समक्रमांक दि.०५.०७.२०१३ व दि.११.०२.२०१५ ची पत्र रद्द ठरतील. शासनाच्या वरील सूचना संबंधितांनी तातडीने अंमलात आणाव्यात, ही विनंती.

आपला

(ब. शे. मांडवे)
उपसचिव.

प्रत,

१) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) प्रधान सचिव (उद्योग) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग, बांधकाम भवन, ३रा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४००० ००१. यांनी पुढील आवश्यक कार्यवाही करावी.
४) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई.
५) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, मुंबई.
६) मुख्य अभियंता (विद्युत) महावितरण कंपनी यांना तातडीच्या कार्यवाहीस्तव.
७) निवडनस्ती.

महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक ईएलडी-२०१३/प्र.क्र. ७९ /ऊर्जा -१
उद्योग.ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ५ जुलै,२०१३

Dir. (F) Dis. 3890.
DATE 09/07/2013

प्रति,

१) व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्या;
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व),
मुंबई -४०००५१.

CE (Commercial)

२) व्यवस्थापकीय संचालक
मे. टाटा पावर कंपनी लिमिटेड, बॉम्बे होऊस,
२४. होमी मोदी स्ट्रिट,
मुंबई-४००००१.

मु. अ./वाणिज्य/आवक क्र. 4178
तारीख 10/07/13

३) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि;
इ-४ ,२ एम.आय.डी.सी. मरोल,
अंधेरी (पूर्व), मुंबई -४०००९३.

४) महाव्यवस्थापक,
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,
बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,
मुंबई -४००००५.

विषय :- विद्युत शुल्क सूट व परतावा संबंधात मुख्य अभियंता (वि.) यांना असलेले अधिकार वीज वितरण कंपन्यांना देणेबाबत.

संदर्भ :- १)शासन ज्ञापन क्र.इएलडी १२७०/४१४०२/ ईलेक्ट-१, दि. ३१ जुलै,१९७०
२) शासन ज्ञापन क्र. इएलडी १२६९/६४६४१/ ईलेट्र-१ दि. २५ जुलै १९६९
३)शासन निर्णय क्र. ईएलडी-२२७०/२८६२९/ईलेक.दि.२७ऑगस्ट,१९७१
४) शासन परिपत्रक क्र. ELD-१२६९/७३५०४/Elec I दि. ७ फेब्रु.१९७०
५)शासन पत्र क्र. ईएलडी-२००८/प्र.क्र.२७६/ऊर्जा-१ दि. १७ नोव्हेंबर २००८
६) शासन पत्र क्र. ELD-१२७५/९६१/NRG-३ दि. १८ मार्च १९७६

Date:............
CE (Com.)
S.E. (Com.I)
S.E. (Com.II)
S.E. (CP)
S.E. (RUC)
GAD

महोदय,

महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम १९५८ मधील कलम ५ क तसेच कलम ३(२) नुसार राज्य शासनाला राजपत्रातील अधिसुचनेव्दारा सूट देण्याचे अधिकार असून उद्योगांना वेळोवेळी वीज शुल्क माफ करण्यात आला आहे. सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अन्वये पात्र उद्योगास सूट देण्याबाबत **शासन पत्र दि. १७/११/२००८** मध्ये कार्यपध्दती नमूद केली आहे. मुंबई वीज शुल्क नियम १९६२ चे नियम १६ व १७ नमूद केल्याप्रमाणे संबंधित उद्योगाने अर्ज करणे आवश्यक असून

अर्ज प्राप्त झाल्यानंतर योग्य ती तपासणी करुन विद्युत शुल्क सूट देण्याची कार्यवाही मुख्य अभियंता (विद्युत) यांच्याकडून करण्यात येते. शासनाने वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार पात्र विद्युत ग्राहकांसंबंधात विद्युत शुल्क भरण्यापासून सूट दिलेली आहे अथवा मुंबई वीज शुल्क अधिनियम १९५८ च्याअनुसूचीमधील भागामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ग्राहकाच्या बाबतीत वेगळ्या दराने (Misclassification) विद्युत शुल्काची आकारणी केल्यास अशा ग्राहकांना विद्युत शुल्क परतावा अनुज्ञेय होतो. शासनाने दि. २५/७/१९६९ व दि. ७/२/१९७० च्या ज्ञापनान्वये मुख्य अभियंता (विद्युत) यांना रु. १०००/- पर्यंतचे परतावा प्रकरणास मंजुरी देण्याचे अधिकार दिले असून सदर मर्यादा शासन पत्र दि. १८ मार्च, १९७६ अन्वये रु. ५०,०००/- पर्यंत वाढविण्यात आली आहे. विद्युत शुल्क परताव्याची रक्कम रु. ५०,०००/- पेक्षा अधिक असल्यास असे प्रस्ताव शासनाच्या दि. १८/३/१९७६ च्या स्थायी आदेशानुसार संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्रमाणित करुन मंजुरीसाठी मुख्य अभियंता (विद्युत) यांच्या कार्यालयाकडून शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येतात. सदर प्रस्तावांना तपासणीअंती शासनस्तरावरुन मंजूरी देण्यात येते.

२. याद्वारे कळविण्यात येते की, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या विद्युत शुल्क माफी संबंधातील अधिसूचनांस अनुसरुन विद्युत शुल्क सूट व परतावा संबंधातील मुख्य अभियंता (विद्युत) यांच्याकडून करण्यात येणारी उपरोक्त कार्यवाही महावितरण, टाटा, रिलायन्स व बेस्ट, या वीज वितरण कंपन्यानी अधिनियमातील तरतुदी, शासनाचे निर्णय / ज्ञापनातील आवश्यक कार्यपध्दतीचे / तरतुदीचे पालन करुन तसेच संगणकीय प्रणाली (IT) वापरुन जलदगतीने करण्यात यावी व वीज ग्राहकांना देण्यात आलेली सूट व परतावा मान्यता प्रकरणांची माहिती दर तीन महिन्यांनी मुख्य अभियंता (विद्युत) यांना सादर करावी. मुख्य अभियंता (विद्युत) कार्यालय वीज वितरण कंपन्याकडून परताव्याबाबत करण्यात आलेली कार्यवाही शासन निर्णय/अधिनियमातील तरतुदी तसेच शासन कार्यपध्दतीप्रमाणे आहे किंवा कसे या संबंधातील तपासणी करील व आढळून आलेल्या त्रुटी सदर कंपन्यांना तीन महिन्यांत कळविण्यात येतील. विद्युत शुल्क परतावा व सूट संबंधातील कोणतेही प्रस्ताव यापुढे शासनास तसेच मुख्य अभियंता (विद्युत) कार्यालयास सादर करण्यात येऊ नयेत.

(आ.म.रामटेके)
शासनाचे उप सचिव(ऊर्जा)

प्रत-

१) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२) प्रधान सचिव (उद्योग) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३) मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग,बांधकाम भवन, ३रा मजला, मर्झबान रोड,फोर्ट,मुंबई -४००००१. यांना कळविण्यात येते की, यापुढे वीज शुल्क परतावा संबंधातील प्रस्ताव संबंधित वीज वितरण कंपन्यांकडे सादर करणेबाबत वीज ग्राहकांना अवगत करण्यात यावे.
४) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता) -१, मुंबई.
५) महालेखापाल (लेखा परीक्षा) -१, मुंबई.
६) निवड नस्ती.

ISSUED
Date: ५/६/२०१३



C:\Desktop\Sayli\ELD Letter.doc